ePaper

## पाकिस्तानलाही ब्रिक्समध्ये यायचेय, पण भारत अडून बसला...!



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 12 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

चाकण–निगडी मेट्रोत आळंदीला स्थानक हवे

## 'ब्रिक्स समिट' मध्ये मोदींकडून प्रतिनिधी देशांचे स्वागत

# BRICSचा विश्वाविस्तार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**२००६ मध्ये अवघ्या चार देशांनी सुरू केलेला ब्रिक्स समूह आज भागीदार देशांसह २१ देशांचे मजबूत व्यासपीठ बनला आहे. ब्रिक्सच्या २० वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही माहिती दिली.**




राजधानीत आयोजित ब्रिक्स बिझनेस फोरमच्या लीडर्स सेशनमध्ये बोलताना मोदी म्हणाले की, जगातील सुमारे ५० टक्के लोकसंख्या ब्रिक्स देशांमध्ये राहते. जागतिक जीडीपीमध्ये ब्रिक्सचा वाटा सुमारे ४० टक्के, तर आंतरराष्ट्रीय व्यापारात २५ टक्क्यांहून अधिक आहे. गेल्या दोन दशकांत जागतिक जीडीपी अडीच पटीने वाढली असताना ब्रिक्स देशांची एकत्रित अर्थव्यवस्था साडेचार पटीने वाढली आहे.

ब्रिक्स आता केवळ व्यापाराचे व्यासपीठ न राहता जागतिक आव्हानांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधण्याचे केंद्र बनत असल्याचे मोदी यांनी सांगितले. भारतात आयोजित यंदाचा ब्रिक्स बिझनेस फोरम आतापर्यंतचा सर्वात मोठा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी ब्रिक्सची आर्थिक ताकद अधोरेखित करताना जागतिक जीडीपीमध्ये ब्रिक्सचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगितले. त्याचवेळी G7 चा वाटा सुमारे २९ टक्क्यांवर असल्याचा दावा करत ब्रिक्स हा जगाच्या आर्थिक वाढीचे 'ग्रोथ इंजिन' बनत असल्याचे त्यांनी म्हटले. परस्पर व्यापार वाढवण्यावरही त्यांनी भर दिला.

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियान यांनी अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून ब्रिक्स देशांनी स्थानिक चलनात व्यवहार वाढवावेत, असे आवाहन केले. जागतिक अस्थिरता आणि निर्बंधांचा सामना करण्यासाठी स्थानिक चलनातील व्यापार महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

### ४ वरून २१ देशांचा विस्तार आणि साडेचार पट वाढलेली अर्थव्यवस्था



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, ब्रिक्स समूह यंदा स्थापनेची २० वर्षे पूर्ण करत आहे. २००६ मध्ये अवघ्या ४ देशांनी एकत्र येत स्थापन केलेला हा गट आज भागीदार देशांसह २१ देशांचे एक मजबूत कुटुंब बनला आहे. गेल्या दोन दशकांतील वाढीची आकडेवारी मांडताना पंतप्रधान म्हणाले, जगातील सुमारे ५० टक्के लोकसंख्या ब्रिक्स देशांमध्ये राहते. जागतिक जीडीपीमध्ये ब्रिक्सचा वाटा तब्बल ४० टक्के, तर आंतरराष्ट्रीय व्यापारात २५ टक्क्यांहून अधिक आहे. या काळात जागतिक जीडीपी अडीच पटीने वाढली असताना, ब्रिक्स देशांची एकत्रित अर्थव्यवस्था तब्बल साडेचार पटीने वाढली आहे.

### ग्लोबल इनोव्हेशनचे नवे केंद्र

पंतप्रधानांनी नमूद केले की ब्रिक्स देश आता केवळ व्यापारापुरते मर्यादित नसून जागतिक आव्हानांवर मात करणारे नावीन्यपूर्ण उपायांचे केंद्र बनले आहेत. तळागाळातील उपक्रमांपासून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंत सर्व क्षेत्रांत येथे नव्या संधी निर्माण होत आहेत. भारतात आयोजित हा फोरम आतापर्यंतचा सर्वात मोठा ब्रिक्स बिझनेस फोरम ठरला असल्याचेही त्यांनी सांगितले.

### स्थानिक चलनात व्यापारावर इराणचा भर

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियान यांनी बिझनेस फोरममध्ये अमेरिकन डॉलरच्या प्रभावाला पर्याय सुचवला. जागतिक अस्थिरता आणि निर्बंधांचा सामना करण्यासाठी सर्व देशांनी आपापल्या स्थानिक चलनात व्यवहार करावेत, असा सल्ला त्यांनी दिला. सद्यस्थितीत खते आणि ऊर्जा (तेल-वायू) ही प्रत्येक राष्ट्राची मूलभूत गरज असून ब्रिक्स देशांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# गणेशोत्सवापूर्वी पुण्यात FDAचा धडाका!

## बुधवार पेठेत ३८ लाखांचा खवा-पनीर जप्त; ४६०० किलो खवा नष्ट

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात शुक्रवारी भेसळयुक्त खवा आणि पनीरविरोधात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली. बुधवार पेठेत सकाळपासून सुरू असलेल्या या धडक मोहिमेत बार्शीहून आलेला तब्बल ४ हजार ६०० किलो खवा नष्ट करण्यात येत असून, कर्नाटकातून आलेल्या १२ हजार ५०० किलो पनीरचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. आतापर्यंत सुमारे ३८ लाख रुपयांचा माल कारवाईच्या कक्षेत आला असून, प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कारवाई निश्चित केली जाणार आहे.**





पुण्याच्या बाजारपेठेत पहाटेपासूनच कर्नाटक भागातून पनीरचे ट्रक येतात. त्यानंतर शहरातील विविध डेअरी उद्योगांमध्ये ते वितरित केले जातात. मात्र, आज, शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजल्यापासूनच अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी बुधवार पेठ आणि शुक्रवार पेठ परिसरात डेरे दाखल झाले होते. ट्रकमधून आलेला माल दुकानात जाण्याऐवजी अधिकाऱ्यांनी तो ताब्यात घेण्यास सुरुवात केली. या कारवाईत बार्शी येथून पुण्यात आलेला तब्बल ४ हजार ६०० किलो खवा अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतला असून, तो पूर्णपणे नष्ट करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धडक कारवाईत अन्न व औषध प्रशासनाचे १२ ते १३ अधिकारी सक्रिय आहेत. कर्नाटक आणि बार्शी या भागांतून पुण्यात येणाऱ्या खवा आणि पनीरच्या साठ्यांची तपासणी करण्यात येत आहे. संशयित माल ताब्यात घेऊन त्याचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात खवा, पनीर आणि इतर दुग्धजन्य पदार्थांना मोठी मागणी असते. या पार्श्वभूमीवर, शहरात मोठ्या प्रमाणावर खवा आणि पनीर बाहेरच्या राज्यांतूनही येतो. यापूर्वीही प्रशासनाने पुणे विभागात बनावट खवा आणि पनीरवर मोठी कारवाई केली होती. मात्र, आजच्या कारवाईचे आदेश दहा ते बारा दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्य कार्यालयाकडून म्हणजेच मुंबईकडून काढण्यात आले होते. त्या संदर्भात पुणे अन्न विभाग येथील अन्न व औषध प्रशासन अधिकारी सहायक आयुक्त याविषयीचे तपशील जमा करत होते, अशी माहिती पुणे विभागातील सूत्रांनी दिली.

पुण्याच्या बाजारपेठेत दररोज अंदाजे २० ते २५ टन पनीर कर्नाटकातून येते. गेल्या ४० वर्षांपासून पुण्यातील बाजारात कर्नाटकमधील बागलकोट भागातून पनीर येते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम उघडल्यामुळे या भागातून येणाऱ्या मालाचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांपर्यंत खाली आले आहे, अशी माहिती डेअरी व्यापाऱ्यांनी दिली.

‘मुंबई कार्यालयाकडून याविषयी आदेश प्राप्त झाले होते. त्यानुसार ही कारवाई सुरू आहे. यामध्ये आतापर्यंत साधारणपणे ३८ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून, याचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी देण्यात येणार आहे. यानंतर नमुन्यांचा जो अहवाल येईल, त्यानुसार कारवाईचे स्वरूप ठरवले जाणार आहे, अशी माहिती सांगली अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश मसारे यांनी दिली.

### कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त

बुधवार आणि शुक्रवार पेठ हा परिसर संवेदनशील असल्याने या भागात स्थानिक पोलीस चौकीतील १५ ते २० पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले. वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक यांच्या आदेशानुसार हा बंदोबस्त ठेवण्यात आला.

---

## गणेशोत्सवात आठ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत लाऊडस्पीकर? आमदार रासने यांचा दावा

**महाईन्यूज । पुणे**

**‘यंदाचा गणेशोत्सव १२ दिवसांचा आहे. त्यामुळे उत्सवातील ८ दिवस रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनिवर्धक यंत्रणेला (लाउडस्पीकर) परवानगी देण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली असून, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे,’ अशी माहिती आमदार हेमंत रासने यांनी दिली. गेल्या वर्षी ७ दिवसांसाठी ध्वनिवर्धक यंत्रणेला परवानगी देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.**



दगडूशेठ मंडळाच्या उत्सवाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत रासने बोलत होते. ते म्हणाले, ‘यंदा १२ दिवसांचा गणेशोत्सव आहे. अनेक मंडळांकडून जिवंत देखावे साकारण्यात येतात. त्यातून सामाजिक-धार्मिक प्रबोधन केले जाते. काही मंडळांकडून वैज्ञानिक संकल्पनांवर आधारलेले देखावे साकारले जातात. या देखाव्यांसाठी ध्वनिवर्धक यंत्रणेची गरज असते. त्यांचा आवाजही मर्यादित असतो. चांगल्या सकारात्मक गोष्टी समाजात पोहचाव्यात म्हणूनच ध्वनिवर्धक यंत्रणेला आठ दिवस परवानगी देण्याची मागणी केली आहे. अश्लील नाचगाणी, धांगडधिंगा घालण्यासाठी ध्वनिवर्धक यंत्रणा लावण्याला विरोध आहे.’

दरम्यान, ‘मेट्रोच्या सुविधेमुळे गणेशोत्सवाच्या काळात होणाऱ्या गर्दीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. मध्यवर्ती भागांत होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने पायाभूत सुविधांचे नियोजन करावे. भाविकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक व्यवस्था उभारण्यात यावी,’ अशा सूचना केल्याचेही रासने यांनी स्पष्ट केले.

### ‘सुरुवातीच्या मंडळांमुळे विसर्जन मिरवणुकीला उशीर’

‘विसर्जन मिरवणुकींमध्ये सकाळी नऊ वाजता मानाचे गणपती प्रस्थान करतात. त्यानंतर रोशणाई नसलेली मंडळे मिरवणुकीत सामील होतात. या मंडळांनतर दुपारच्या सुमारास काही वेळ शिल्लक राहायचा. वेळेचे हे अंतर कमी व्हावे म्हणून, श्रीमंत दगडूशेठ गणपती मंडळाने दुपारी चारच्या सुमारास प्रस्थान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यंदाही चार वाजता श्रीमंत दगडूशेठ गणपती प्रस्थान करील. सुरुवातीला निघणारे गणपती वेळेत निघाले, तर विसर्जन मिरवणुकीला उशीर होणार नाही,’ असे हेमंत रासने यांनी सांगितले.

# चाकण-निगडी मेट्रोत आळंदीला स्थानक हवे

## महापौर रवी लांडगे यांची दिशा समितीत जोरदार मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी शहरातील पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक, नदी प्रदूषण आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न मांडले. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर आवश्यक सहकार्य आणि पाठपुरावा करण्याची मागणी त्यांनी केली.**



### आळंदीच्या मेट्रोसाठी मागणी

चाकण-निगडी प्रस्तावित मेट्रो मार्गिकेत आळंदी स्थानकाचा समावेश करण्याची मागणी महापौर रवी लांडगे यांनी केली. आवश्यक परवानग्या आणि केंद्राकडून निधीसाठी पाठपुरावा करण्याची विनंती त्यांनी केली.

प्रस्तावित चाकण-निगडी मेट्रो मार्गिकेत आळंदी स्थानकाचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी लांडगे यांनी केली. त्यासाठी आवश्यक परवानग्या तसेच केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करण्याची विनंती त्यांनी केली. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी नदीक्षेत्रातील सर्व महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय यंत्रणा आणि संबंधित प्राधिकरणांनी समन्वयाने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रदूषणाची कारणे निश्चित करून सांडपाणी प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण आणि नदी संवर्धनासाठी ठोस व कालबद्ध कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

# गुन्हेगारीचा कहर; तोतया आमदारांसह खंडणीखोर पोलिसांच्या रडारवर




### पाच कोटींच्या खंडणीचा डाव उधळला

कंपनीचे काम बंद पाडण्याची आणि जिवे मारण्याची धमकी देत पाच कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या टोळीतील चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. खंडणीपोटी २५ लाख रुपयांची रोकड स्वीकारताना आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकले.

### बनावट आमदार लोगोचा पर्दाफाश

मोटारीवर अशोक स्तंभासह 'आमदार' असा बनावट लोगो लावून फिरणाऱ्या दोघांवर वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. स्वतः किंवा कुटुंबातील कोणीही आमदार नसताना हा लोगो वापरल्याचे तपासात समोर आले.

### पोलिसांची धडक कारवाई

बनावट 'आमदार' लोगो, एमडी ड्रग्ज, खंडणी, धमकी आणि शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विविध कारवाया केल्या. पाच कोटींच्या खंडणीप्रकरणी चौघांना ताब्यात घेण्यात आले.

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात विविध गुन्ह्यांच्या प्रकरणांत पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. मोटारीवर बनावट 'आमदार' लोगो लावून फिरणाऱ्या दोघांसह विद्यार्थिनीला मारहाण करणारी शिक्षिका, एमडी ड्रग्ज बाळगणारा डिलिव्हरी बॉय, खंडणी मागणारे आरोपी आणि शासकीय कार्यालयात अरेरावी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

कस्पटे वस्ती, वाकड येथे मोटारीवर 'महाराष्ट्र विधानसभा सदस्य - आमदार' असा बनावट लोगो लावून फिरणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. तपासणीदरम्यान काळ्या काचा असलेली मोटार आढळली. त्यावर अशोक स्तंभासह 'आमदार' असा लोगो होता. संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही आमदार नसतानाही फसव्या उद्देशाने हा लोगो वापरल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

इंदिरानगर, पिंपरी येथे शाळेचे वर्कबुक खरेदी न केल्याच्या कारणावरून आठ वर्षीय विद्यार्थिनीला शिक्षिकेने मारहाण केल्याचा प्रकार समोर आला. विद्यार्थिनीच्या गालावर चापट मारून उलट्या हाताने तोंडावर मारहाण केल्याप्रकरणी शिक्षिकेविरोधात बाल न्याय अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देहूरोड कटक मंडळाच्या कार्यालयात विनापरवाना प्रवेश करून कनिष्ठ अभियंत्याला शिवीगाळ, अरेरावी आणि धमकी देत शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी कार्यालयात गोंधळ घालत अभियंत्यावर हल्ल्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

पिंपळे गुरव परिसरात विक्रीसाठी आणलेले एक लाख १४ हजार रुपये किमतीचे ५.७ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज सांगवी पोलिसांनी जप्त केले. डायनासोर गार्डनजवळील पीएमपीएमएल बसथांब्यावर सापळा रचून डिलिव्हरी बॉय आर्यन विजय खेडेकर (१९) याला ताब्यात घेण्यात आले.

आधारकार्डातील नाव परस्पर बदलून आर्थिक अडचणीत आणत नाव पूर्ववत करण्यासाठी ४० हजार रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी रावेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पैसे न दिल्यास जिवे मारण्याची आणि कुटुंबीयांच्या ओळखपत्रातही बदल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

दरम्यान, माहिती अधिकाराचा धाक दाखवत कंपनीचे काम बंद पाडण्याची आणि जिवे मारण्याची धमकी देऊन पाच कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या टोळीतील चार जणांना भोसरी एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपी २५ लाख रुपयांची रोकड स्वीकारताना पोलिसांच्या हाती लागले. या प्रकरणाचा तपास सुरू आहे.



## भूमिका

**२५ वर्षांपूर्वी ११ सप्टेंबरला अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण जग हादरले. विमानेच अस्त्र बनवून हजारो निष्पाप लोकांच्या जीवावर घाला घालण्याची कल्पनाच भयावह होती. त्या दिवशी केवळ अमेरिकेच्या दोन गगनचुंबी इमारती कोसळल्या नाहीत, तर सुरक्षिततेबाबतचा जगाचा भ्रमही कोसळला.**

# एका दुःस्वप्नाची पंचविशी; ९/११नंतर बदललेले जग



९/११ नंतर जगातील दहशतवादविरोधी धोरणे, आंतरराष्ट्रीय संबंध आणि सुरक्षाव्यवस्था आमूलाग्र बदलली.

या घटनेकडे केवळ अमेरिकेवरील हल्ला म्हणून पाहणे अपुरे ठरेल. ९/११ नंतर अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये युद्धे केली. दहशतवादाचा बीमोड करण्याच्या नावाखाली लाखो नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. ज्यांचा या हल्ल्याशी थेट संबंध नव्हता, अशा देशांनाही त्याची किंमत मोजावी लागली. महासत्ता म्हणून अमेरिकेच्या सामर्थ्याबरोबरच तिच्या निर्णयांतील अहंकार आणि राजकीय स्वार्थही जगासमोर आला.

मात्र या पंचवीस वर्षांत अमेरिकेत एक महत्त्वपूर्ण बदल झाला. खनिज तेलासाठी पश्चिम आशियावर असलेले तिचे अवलंबित्व कमी झाले. तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि ऊर्जा क्षेत्रातील नव्या प्रयोगांच्या बळावर अमेरिका तेल उत्पादनात स्वावलंबी झाली आणि पुढे निर्यातदार देश म्हणूनही उभी राहिली. संकटातून धडा घेऊन दीर्घकालीन धोरण आखले तर एखादा देश स्वतःचे भवितव्य कसे बदलू शकतो, याचे हे उदाहरण आहे.

दुसरीकडे ९/११चा सूत्रधार अल-कायदा आज पूर्वीच्या ताकदीत राहिलेला नाही. ओसामा बिन लादेन आणि त्यानंतर अयमान अल-जवाहिरी यांचा खात्मा झाला. विविध देशांतील या संघटनेच्या शाखांवर कारवाई झाली. निधी आणि नेतृत्वाचा अभाव निर्माण झाल्याने तिचे सामर्थ्य कमी झाले. मात्र दहशतवाद संपला असे म्हणता येणार नाही. अल-कायदाच्या जागी इस्लामिक स्टेटसारख्या अधिक क्रूर संघटनांनी डोके वर काढले. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते— दहशतवादी संघटनेचा पराभव म्हणजे दहशतवादाचा अंत नव्हे. इतिहासाचा सर्वात मोठा धडा असा की, राजकीय स्वार्थासाठी हिंसक किंवा कट्टर शक्तींना खतपाणी घातले की त्या शक्ती कधी ना कधी पोसणाऱ्याच्याच विरोधात उभ्या राहतात. शीतयुद्धाच्या काळात साम्यवाद रोखण्यासाठी अमेरिकेने ज्या कट्टर शक्तींना प्रोत्साहन दिले, त्याच धोरणाचे दुष्परिणाम पुढे अमेरिकेलाच भोगावे लागले. त्यामुळे दहशतवादाला 'चांगला' किंवा 'वाईट' असा सोयीचा भेद करता येत नाही.

९/११ची पंचविशी हा केवळ एका हल्ल्याचा स्मृतिदिन नाही. तो राजकीय दूरदृष्टीच्या अभावाचा, अतिरेकी शक्तींना पोसण्याच्या चुकीचा आणि निष्पाप नागरिकांना युद्धाची किंमत मोजावी लागण्याचा इशारा आहे. दहशतवादाचा सामना करताना महासत्तांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. अन्यथा एका दुःस्वप्नाचा अंत करताना दुसरे दुःस्वप्न जन्माला घालण्याची शक्यता कायम राहील.

## प्रासंगिक »

# शेवटची संधी

**एका गावात माधव नावाचा शेतकरी राहत होता. त्याच्या शेतात विहीर होती; मात्र तिचे पाणी हळूहळू कमी होत होते. गावातील एका वृद्धाने त्याला सांगितले, "विहिरीची स्वच्छता कर. पाण्याचा मार्ग मोकळा होईल."**

माधवने ते ऐकले नाही. तो म्हणाला, "उद्या पाहू." असे करता करता अनेक दिवस गेले. उन्हाळा वाढला आणि विहीर जवळजवळ कोरडी पडली. शेवटी माधवला आपल्या चुकीची जाणीव झाली. त्याने दुसऱ्या दिवशी विहीर स्वच्छ करण्यास सुरुवात केली.

सुरुवातीला गाळ, दगड आणि कचरा काढताना खूप त्रास झाला. पण त्याने काम सोडले नाही. काही दिवसांनी विहिरीच्या तळाशी पाण्याचा झरा पुन्हा दिसू लागला. माधवला आनंद झाला. वृद्धाने त्याला सांगितले, "संधी वेळेवर ओळखली तर संकट टाळता येते; पण उशीर झाला तरी प्रयत्न सोडू नयेत."

त्या दिवसापासून माधवने कोणतेही काम उद्यावर ढकलले नाही. त्याला कळले की वेळ निघून जाते, पण मेहनतीने काही चुका सुधारता येतात.

- तात्पर्य : वेळेवर प्रयत्न करा; उशीर झाला तरी हार मानू नका.

सत्ता आली की कार्यकर्त्यांच्या वर्तनात बदल होणे ही राजकारणातील नवी गोष्ट नाही. विरोधात असताना जो पक्ष आक्रमक दिसतो, तो सत्तेत आल्यानंतर काहीसा सुस्त होतो. कार्यालयांतील वर्दळ कमी होते, प्रश्नांवरील तत्परता घटते आणि सत्तेची सूज जाणवू लागते.

# नवे आले, जुने नाराज; भाजपमध्ये निष्ठेची कसोटी




सध्या भाजपमध्ये दिसणारे 'जुने विरुद्ध नवे' हे चित्र याच पार्श्वभूमीवर पाहावे लागेल. भाजपमध्ये अनेक वर्षे काम केलेल्या जुन्या कार्यकर्त्यांची नाराजी समजण्यासारखी आहे. आयुष्य पक्षासाठी खर्च केलेल्या व्यक्तीला कालपर्यंत विरोधात असलेला नेता अचानक पक्षात येतो आणि लगेच महत्त्वाचे पद, तिकीट किंवा सत्तेतील स्थान मिळवतो, तेव्हा मनात खदखद निर्माण होणारच. मात्र केवळ जुना असल्यामुळे कायम पहिल्या रांगेत राहण्याचा अधिकारही कोणाला मिळत नाही. राजकारण हे संग्रहालय नाही. काळानुसार नेतृत्व, कार्यपद्धती आणि चेहरे बदलत असतात. दुसरीकडे, नव्यांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

पक्षात प्रवेश केल्यानंतर लगेच जन्मजात निष्ठावंत असल्याचा आव आणणे हा राजकारणातील विनोदाचा विषय ठरू शकतो. कालपर्यंत दुसऱ्या पक्षाचा झेंडा हातात घेणाऱ्यांनी आज आपल्या नव्या पक्षाशी जन्मजन्मांतरीचे नाते सांगणे म्हणजे निष्ठा नव्हे. निष्ठा ही भाषणातून सिद्ध होत नाही; ती सत्तेच्या काळात नव्हे, तर संकटाच्या काळात दिसते. खरा प्रश्न असा आहे की निष्ठा पक्षाशी असते की सत्तेशी? विचारांशी असते की व्यक्तीशी? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याने स्वतःला द्यायला हवे. सत्तेत असताना सगळे जवळचे वाटतात; सत्ता गेल्यावर कोण सोबत उरते, यावर खरी निष्ठा ठरते.भाजपमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर बाहेरून आलेले नेते-कार्यकर्ते आहेत. त्यांना पक्षाचा इतिहास, विचारधारा आणि संघर्षाची परंपरा समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशिक्षण उपक्रम स्वागतार्ह आहेत. मात्र हे प्रशिक्षण केवळ नव्यांसाठी नको.

जुन्या शिलेदारांनाही सत्ता कायमची नसते, याची आठवण करून देणे तितकेच आवश्यक आहे. पक्षाला आज नव्या रक्ताची गरज आहे; पण नव्या रक्ताला पक्षाचे संस्कारही आवश्यक आहेत. फुलपाखरांना प्रत्येक फुलावर बसण्याची सवय असते; पक्षाने मात्र त्यांना एका विचाराच्या घरट्यात स्थिर होण्याचे भान द्यायला हवे. त्याचवेळी जुन्यांनी नव्यांना संधी देण्याची उदारता दाखवायला हवी. कारण शेवटी पक्ष मोठा असतो, व्यक्ती नव्हे. सत्ता येते-जाते; विचार आणि संघटन टिकली पाहिजे. सत्तेची सूज उतरल्यावरही जो पक्ष जनतेत उभा राहतो, तोच खरा मजबूत पक्ष!

## || अभंगवाणी ||



कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार ।
एकाचें उत्तर एका न ये ॥१॥

तैसें मज नको करूं कमळापति ।
देई या संगति सज्जनांची ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जेट्टी, पोचरस्त्यांसाठी १७० कोटी

## १०४ कामांना गती; रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्गातील प्रकल्पांचा समावेश

**महाईन्यूज । मुंबई**

**किनारपट्टीच्या विकासासाठी जेट्टी उभारणी आणि जेट्टीपर्यंतच्या रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी राज्य सरकारने १७० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मुंबईसह कोकणातील १०४ कामांसाठी हा निधी देण्यात आला असून, जेट्टी, पोचरस्ते, संरक्षक भिंती, धूपप्रतिबंधक बंधारे, गाळ काढणे आणि प्रवासी सुविधांची कामे त्यातून केली जाणार आहेत. यातील ७५ कामांसाठी १२६ कोटी, तर बंदरांपर्यंत रस्ते, रेल्वेमार्ग आणि बॅकवॉटर विकासाच्या २९ कामांसाठी ४४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**



'महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान, तरंगती जेट्टी व तत्सम प्रवासी सुविधा पुरवणे' या योजनेतील ७५ कामांकरिता ५७७ कोटी ५३ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मार्च २०२६ अखेर या कामांसाठी १३३ कोटी ९२ लाख रुपये वितरित झाले असून, २०२६-२७ मध्ये आणखी १२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ही कामे होतील.

मुंबई परिसरातील कुलाबा-गीतानगर येथील संरक्षक भिंत, खार-दांडा, बेलापूर प्रवासी जेट्टी यांसह डोंबिवली, उत्तन आणि ठाणे परिसरातील जेट्टी व पोचरस्त्यांच्या कामांचा यात समावेश आहे. कुलाबा येथील कामे १०० टक्के मार्गी लागली असून, बेलापूरमध्ये अद्याप ४० टक्के कामे प्रलंबित आहेत. पालघरमधील वसई किल्ला, नायगाव, वसई रो-रो जेट्टी, नारंगी, अर्नाळा किल्ला परिसरातील जेट्टी व प्रवासी सुविधांच्या कामांना निधी देण्यात आला आहे. नायगाव बेनकर जेट्टीची उंची वाढविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

या कामांना पूरक अशा रस्त्यांकरिता परिवहन विभागाने 'बंदरापर्यंत रस्ते/रेल्वेमार्ग बांधणे आणि पश्चजल (बॅकवॉटर) विकास' या योजनेतील २९ कामांसाठी ४४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. याकरिताही ५१७ कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद असून त्यापैकी साधारण ११४ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

या योजनेअंतर्गत पालघरमध्ये शंकर मंदिर-दांडा, पांजू, चिंचणी, सतपती, वडराई, खारेकुरण, वडिव, राजोडी, कळंब आणि नारंगी रो-रो जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण होईल. काही कामांची प्रगती ९० ते १०० टक्क्यांवर पोहोचली असली तरी पिंपळनेर येथील खाडीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम रखडले आहे.

रायगडमधील रेवदंडा रो-रो जेट्टी, अलिबाग, धरमतर, महाड, मुरूड, नागाव आणि करंजा परिसरातील पोचरस्त्यांची कामे, तर रत्नागिरीतील बंदरांतर्गत रस्ते आणि राजीवाडा येथील बंधाऱ्याचे कामही या योजनेत आहे. १४३ कोटी ९७ लाख खर्चून राजीवाडा बंधारा बांधला जाणार आहे. हे काम २५ टक्क्यांवर झाले आहे.

### रायगडमधील प्रकल्पांना निधी

रायगडमधील जेट्टी आणि त्यांच्याशी संबंधित सुविधांना प्राधान्य दिले गेले आहे. वसोली येथील रो-रो जेट्टी, पोचरस्ता, गाळ काढणे आणि दगडी बंधाऱ्याची दुरुस्ती, तसेच आक्षीसागर येथील जेट्टी, पोचरस्ता, गाळ काढणे आणि अन्य सुविधांसाठी प्रत्येकी १२ कोटी रुपयांची तरतूद आहे. आक्षीसागरमध्ये २० टक्के कामे झाली असून रेवस जेट्टी परिसरातील वाहनतळ आणि स्वच्छतागृहाचे कामही केवळ ३० टक्केच झाले आहे.

# 'पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये होणार', उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**महाईन्यूज । मुंबई**

**जगभरात विखुरलेल्या मराठी बांधवांना, उद्योजकांना आणि मराठी संस्कृतीला एका वैश्विक व्यासपीठावर आणण्यासाठी पुढील 'विश्व मराठी साहित्य संमेलन' लंडनमध्ये आयोजित करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. लंडन येथील ऐतिहासिक अशा महाराष्ट्र मंडळाने त्यांचा 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार देऊन सन्मान केला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली. सातासमुद्रापलीकडे मराठी माणसाने झेंडा फडकवला आहे, त्यामुळे महाराष्ट्र मंडळाच्या पाठीशी सरकार आणि एकनाथ शिंदे म्हणून मी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.**




आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला, तरी तो आपली माती, भाषा आणि संस्कृती कधीही विसरत नाही. नुकताच मराठी भाषेला केंद्र सरकारकडून 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेचा हा डंका जगभरात गाजवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर मराठी माणसांना मजबुतपणे जोडण्यासाठी लंडनमध्ये विश्व मराठी साहित्य संमेलन भरवले जाईल तसेच जगभरातील मराठी भाषकांसाठी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याबाबतही विचार करीत असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र मंडळाने पुढेही लंडनमध्ये मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्याचे काम सुरू ठेवावे. तुमच्या पाठीशी सरकार आहे आणि एकनाथ शिंदेही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

### लंडनशी महाराष्ट्राचे संबंध जुने

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा लंडनशी सबंध येऊन गेला आहे असे सांगून उपमुख्यमंत्र्यांनी बाबासाहेबांच्या लंडनमधील वास्तव्याच्या ठिकाणाचे स्मारक महाराष्ट्र सरकारने विकसित केल्याचे सांगितले. लंडनमध्ये ज्या वास्तूत बाबासाहेबांचे वास्तव्य होते, तेथे नतमस्तक होण्याचे भाग्य मला लाभले. बाबासाहेबांनी लिहिलेल्या अद्वितीय संविधानामुळेच आज माझ्यासारखा सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता राज्याच्या सर्वोच्च पदावर सेवा करू शकत आहे, अशा भावना त्यांनी या वेळी व्यक्त केल्या.

# ‘ब्रिक्स’वरून काँग्रेसमध्ये मतभेद!

## शशी थरूर यांच्याकडून भरभरून कौतुक; तर पी.चिदंबरम यांनी उपस्थित केले प्रश्न

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीत १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ रोजी यंदाची १८ वी ‘ब्रिक्स शिखर परिषद’ पार पडत आहे. या ब्रिक्स परिषदेसाठी अनेक देशांचे प्रमुख दिल्लीत दाखल झाले आहेत. ही ब्रिक्स परिषद भारतात होत असल्याने जगाचं लक्ष भारताकडे लागलेलं आहे. मात्र, या ब्रिक्स परिषदेवरून काँग्रेसच्या दोन दिग्गज नेत्यांमधील मतभेद आता समोर आले आहेत. या परिषदेवर काँग्रेसच्या नेत्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्याने चर्चांना उधाण आलं आहे.**





काँग्रेसचे नेते पी.चिदंबरम यांनी ‘ब्रिक्स’कडून भारताला नक्की काय मिळालं? किंवा ठोस फायदे काय झाले? असा सवाल उपस्थित केला आहे. मात्र, काँग्रेसचे नेते तथा खासदार शशी थरूर यांनी या ‘ब्रिक्स शिखर परिषदे’चं कौतुक केलं आहे. चिदंबरम आणि थरूर यांच्यातील या मतभेदामुळे आता भाजपाला टीका करण्यासाठी एक नवा मुद्दा मिळाल्याची चर्चा रंगली आहे.

पी. चिदंबरम यांनी गुरुवारी ब्रिक्स शिखर परिषदेच्या फायद्यांवरून सवाल उपस्थित केले. दुसरीकडे शशी थरूर यांनी या ब्रिक्स परिषदेचं यजमानपद भारताने भूषवणं ही ‘अत्यंत प्रतिष्ठेची बाब’ असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांमधील या परस्परविरोधी भूमिकांवरून चर्चांना उधाण आलं आहे.

“सर्वप्रथम आपण ‘ग्लोबल साउथ’साठी एक महत्त्वाचं व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत. तुम्हाला माहित आहेच की, ‘ग्लोबल साउथ’मध्ये १०० पेक्षा अधिक देशांचा समावेश आहे. मात्र, या ठिकाणी ‘ग्लोबल साउथ’मधील ११ प्रमुख देश एकत्र आले आहेत. हे देश एकत्रितपणे विविध दृष्टिकोन आणि देशांच्या विविधतेचे प्रतिनिधित्व करतात. ज्यांचं नेतृत्व आपण या ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने करत आहोत. ब्रिक्समधील हे ११ देश जगातील बहुसंख्य लोकसंख्या असलेले आणि जागतिक जीडीपीच्या ४१ टक्के हिश्शाचे प्रतिनिधित्व करतात”, असं थरूर यांनी म्हटलं आहे.

शशी थरूर यांनी भारताच्या यजमानपदाच्या निर्णयाचंही समर्थन केलं. दिल्लीत अनेक जागतिक नेत्यांची उपस्थिती असणं ही एक मोठी राजनैतिक जमेची बाजू असल्याचं सांगितलं. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेक देशांचे प्रमुख ब्रिक्सच्या निमित्ताने भारतात येणं ही आपल्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची बाब आहे. यातून भारताची ‘राजनैतिक पातळीवर विविध देशांना एकत्र आणण्याची क्षमता दिसून येते, ज्याला जागतिक मंचावर स्वतःचं असं वेगळं महत्त्व आहे, असं थरूर यांनी म्हटलं आहे.

### भाजपाने काय प्रत्युत्तर दिलं?

भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी गुरुवारी चिदंबरम यांच्या विधानांवर टीका केली. “आज जर तुम्ही काँग्रेसकडे पाहिलं, तर भारतात ब्रिक्स शिखर परिषद होत असताना ते एखाद्या ‘नाराज फुफा’प्रमाणे त्याला विरोध करत आहेत. याचं कारण असं की काँग्रेसला माहित आहे की, जेव्हा-जेव्हा देशाची प्रगती होते किंवा भारताचा अभिमान वाढवण्याची वेळ येते, तेव्हा काँग्रेस पक्ष नेहमीच त्याला विरोध करतो.”

### चिदंबरम यांनी काय म्हटलं?

दरम्यान, ब्रिक्स परिषदेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पी.चिदंबरम यांनी म्हटलं की, गेल्या दोन-तीन शिखर परिषदांमधून कोणतेही महत्त्वपूर्ण किंवा ठोस फायदे किंवा परिणाम दिसून आलेले नाहीत. चिदंबरम म्हणाले की,”या परिषदेला किती पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्ष उपस्थित राहत आहेत, याची मला कल्पना नाही. मला वाटत नाही की गेल्या दोन-तीन ब्रिक्स परिषदांतून काही ठोस निष्पन्न झालं आहे.”

---

# ट्रम्प प्रशासन अखेर झुकलं, भारतीयांविरोधातील वंशभेद करणारी जाहिरात काढली!

**महाईन्यूज । अमेरिका**

**यूएस डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीने (DHS) गुरुवारी सेल्फ डिपोर्टेशनची एक जाहिरात मागे घेतली आहे. या जाहिरातीत शीख समुदायाला लक्ष्य केल्याच्या आरोप करण्यात आला असून याला प्रचंड विरोध झाला होता. “मिस्टर सिंग” यांना सेल्फ डिपोर्टेशन (मायदेशी पाठवण्याचं) करण्याचं आवाहन करणाऱ्या या जाहिरातीवर भारतीय-अमेरिकन गट आणि डेमोक्रेटिक नेत्यांनी वर्णद्वेषी प्रचार म्हणून तीव्र टीका केली होती.**



DHS ने एका मोहिमेअंतर्गत एक्सवर एक एआयनिर्मिती जाहिरात प्रसिद्ध केली होती. यामध्ये एका तपकिरी रंगाची दाढी असलेल्या व्यक्तीला दाखवण्यात आलं होतं. अमेरिकेतील परवाना नसलेल्या व्यावसायिक चालकांविरोधात ही जाहिरात होती. “आमच्या रस्त्यांवरून बाजूला व्हा, तुम्हाला गाडी चालवता येत नाही मिस्टर सिंग”, अशी या जाहिरातीचा टॅगलाईन होती. या जाहिरातीवरून मोठा वाद निर्माण झाला होता. परिणामी ही जाहिरात आता हटवण्यात आली असल्याचं वृत्त हिंदूस्तान टाइम्सने दिलं आहे.

भारतीय नागरिकांच्या वकिली गटांनी ही जाहिरात हटवण्याच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, हिंदू अमेरिकन फाउंडेशनने म्हटलं आहे की, “आम्ही काल ज्या पोस्टवर आक्षेप घेतला होता, ती DHS ने आता हटवली आहे. आम्ही या निर्णयाचं स्वागत करतो. परंतु जेव्हा एखादी फेडरल एजन्सी राजकीय फायदा घेण्यासाठी भारतीय/शीख व्यक्तीचं वर्णद्वेषी व्यंगचित्र वापरते, तेव्हा पोस्ट काढून टाकणं हे केवळ पहिलं पाऊल ठरतं.”

या ट्रान्सफॉर्मर्स-शैलीतील जाहिरातीचा स्क्रीनशॉट शेअर करत कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅविन न्यूजम यांनी DHS वर जोरदार टीका केली. ते म्हणाले, “हे अत्यंत घृणास्पद आहे. ट्रम्प सरकार शीख समुदायाला लक्ष्य करणारा वर्णद्वेषी प्रचार पसरवत आहे.” या विरोधाला प्रत्युत्तर म्हणून DHS ने ट्रक चालक हरजिंदर सिंग याच्याशी संबंधित दुसरी पोस्ट शेअर केली. हरजिंदर सिंग याला गेल्या वर्षी एका बेकायदेशीर यु-टर्नमुळे झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाल्यानंतर अटक करण्यात आली होती.

कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरना उत्तर देताना DHS ने कॅप्शनमध्ये लिहिलं, “हे बघा गॅविन, तुम्हीच त्याला (हरजिंदर सिंग) कमर्शियल ड्रायव्हिंग लायसन्स (CDL) दिलं होतं आणि त्यानंतर त्याने आपल्या ट्रॅक्टर-ट्रेलरने तीन जणांचा जीव घेतला.” कॅलिफोर्नियाचे सिनेट सदस्य अ‍ॅडम शिफ यांनी ट्रम्प प्रशासनावर टीका केली आणि DHS च्या या जाहिरात मोहिमेला “द्वेषपूर्ण, अपमानास्पद आणि अन-अमेरिकन” म्हटलं. त्यांनी ‘X’ वर लिहिलं की, “प्रशासन आणि DHS त्यांची उघड कट्टरता लपवण्याचा कोणताही प्रयत्न करत नाहीत. ते लाखो अमेरिकेच्या नागरिकांच्या पार्श्वभूमीवर आणि दिसण्यावर, विशेषतः या प्रकरणात शीख समुदायावर संशय निर्माण करत आहेत.”



# मलायकाचा डाएट फंडा!

मलायका अरोरा कायमच तिच्या फिटनेसमुळे चर्चेत असते. ती सोशल मीडिया व मुलाखतींच्या माध्यमातून फिटनेसबद्दल तसेच ती स्वत:ची कशी काळजी घेते याबद्दल सांगत असते. आता मलायकाचे एक जुने वक्तव्य चर्चेत आहे. अभिनेत्रीने २०१९ ला पिंकविलाला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिने तिच्या डाएटबद्दल वक्तव्य केले होते. ती म्हणालेली, “मी नाश्ता करत नाही, कारण मी उपवास करते. मी इंटरमिटंट फास्टिंग करते, त्यामुळे मी नाश्ता करत नाही. मी थेट जेवण करते.” पुढे ती म्हणालेली, “माझ्या जेवणात डाळ, भात, भाजी, रोटी असते; जे सेंद्रिय पद्धतीने पिकलेले आहे ते जास्तीत जास्त खाण्याचा मी प्रयत्न करते. रात्रीच्या जेवणात बऱ्याचदा मी सूप घेते, मला खिचडी खूप आवडते.” दरम्यान, मलायका अरोरा सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांच्या संपर्कात असते. ती योगासने, व्यायाम याबद्दल सांगत असते. कोणती योगासने केल्यानंतर काय फायदे होतील, याबद्दलही ती चाहत्यांना माहिती देते, त्यामुळे मलायका कायम चर्चेत येते.




# हार्दिकसोबतच्या अफवांवर अमिषाने सोडलं मौन!

बॉलिवूड अभिनेत्री अमिषा पटेल आणि क्रिकेटपटू हार्दिक पांड्या यांच्या कथित अफेअरच्या चर्चा सध्या सोशल मीडियावर रंगल्या आहेत. मुंबईतील एका कार्यक्रमातील दोघांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या चर्चांना सुरुवात झाली. यावर अमिषाने सोशल मीडिया पोस्टद्वारे अफवांवर उपरोधिक प्रतिक्रिया दिली. “ज्या प्रकारे मी त्याच्यावर हात ठेवला होता, ते खूप रोमँटिक होतं,” असा टोला तिने लगावला. तसेच, अशा पोस्ट करण्यापूर्वी संबंधित युझरने आधी गर्लफ्रेंड बनवावी, असंही अमिषाने म्हटलं. पापाराझींनी याबाबत प्रश्न विचारल्यानंतर अमिषाने मिश्कीलपणे, “ते इतकं व्हायरल झालंय की आता ते संपलंय,” असं उत्तर दिलं.



# सैफ-कियारा प्रथमच एकत्र!



कियारा अडवाणी सध्या ‘टॉक्सिक’ चित्रपटावरून चर्चेत आहे. या चित्रपटातील तिच्या इंटेंस रोलला प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे. आता कियाराला एक मोठा चित्रपट मिळाला असून यात तिची जोडी सैफ अली खानसोबत जमणार आहे.  सैफ अन् कियारा प्रथमच एका इंटेंस थ्रिलर सुपरनॅचरल चित्रपटाकरता एकत्र येणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन कनिका ढिल्लों करत असून फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांची कंपनी याची निर्मिती करत आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण चालू वर्षाच्या अखेरपर्यंत सुरू होणार आहे. कनिकाचा हा चित्रपट पूर्णपणे एक इंटेंस सुपरनॅचल थ्रिलर धाटणीचा असेल, एक्सेल एंटरटेन्मेंटची टीम पटकथेवर दीर्घकाळापासून काम करत असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. कनिका ढिल्लोंने यापूर्वी मनमर्जियां, केदारनाथ, जजमेंटल है क्या, हसीन दिलरुबा, रक्षाबंधन आणि डंकी यासारख्या चित्रपटांची लेखिका म्हणून काम केले आहे. याचबरोबर तिने क्रीति सेनॉनसोबत मिळून ‘दो पत्ती’ चित्रपटाची निर्मिती केली होती. आता ती सैफ आणि कियारा यांची मुख्य भूमिका असलेल्या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण करणार आहे.

# वयाच्या २२ व्या वर्षी खास अर्धशतक!

## टी-२० क्रिकेटमधील एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावरकरणारी श्री चरणी ठरली दुसरीच भारतीय

**महाईन्यूज । लंडन**

**महिला आशिया चषक २०२६ स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलचा सामना भारत आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने दमदार कामगिरी करून ऐतिहासिक विजयाची नोंद केली. या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठीआ आलेल्या भारतीय संघाकडून शफाली वर्मानेे तुफान फटकेबाजी करून अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने १४९ धावांपर्यंत मजल मारली. या धावांचा बचाव करताना युवा फिरकी गोलंदाज श्री चरणीने एकमेव गडी बाद केला.**




या कामगिरीच्या बळावर तिने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

या सामन्यात बांगलादेशचा संघ १५० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. यादरम्यान श्री चरणीने बांगलादेशची सलामीवीर फलंदाज जुएरिया फर्दोसला ऋचा घोषच्या हातून झेलबाद करत माघारी धाडलं. हा तिच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ५० वा विकेट ठरला. यासह तिने एक खास रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. श्री चरणी ही टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात ५० गडी बाद करणाऱ्या भारतीय गोलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानी पोहोचली आहे. श्री चरणीने वय २२ वर्ष ३७ दिवस असताना ५० गडी बाद केले आहेत. तर राधा यादवने २० वर्ष ३३४ दिवस इतकं वय असताना हा खास रेकॉर्ड आपल्या नावावर केला होता. तर दीप्ती शर्मानेवय २२ वर्ष १८७ दिवस इतकं असताना ५० गडी बाद केले होते.

या यादीत अव्वल स्थानी असलेल्या सोफी एक्लेस्टोनने वय २० वर्ष ३०० दिवस इतकं असताना टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५० गडी बाद करण्याचा पराक्रम केला होता. तर राधा यादव या यादीत दुसऱ्या स्थानी आहे. तर अमेलिया केरने २१ वर्ष ३५४ दिवस इतकं वय असताना ५० गडी बाद केले होते. तर श्री चरणी या स्टार खेळाडूंच्या यादीत चौथ्या स्थानी पोहोचली आहे. यामुळे श्री चरणीच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, भारतीय महिला क्रिकेटसाठी ही निश्चितच अभिमानाची बाब ठरली आहे. कमी वयात सातत्यपूर्ण कामगिरी करत तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. भविष्यातही तिच्याकडून अशाच दमदार कामगिरीची अपेक्षा क्रिकेटप्रेमींना आहे.

### भारतीय संघाचा एकतर्फी विजय

या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर १४९ धावा केल्या. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना शफाली वर्माने सर्वाधिक ६४ धावांची खेळी केली. तर हरमनप्रीत कौरने २४, प्रतिका रावलने २० आणि ऋचा घोषने २१ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशकडून शोरना अक्तेरने २२ आणि दिलारा अक्तेरने २१ धावा केल्या. बांगलादेशला २० षटकांअखेर ७ गडी बाद १०९ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह भारतीय संघाने हा सामना ४० धावांनी आपल्या नावावर केला.

---

# रायन टेन डोशेट, टी दिलीपनंतर आणखी एका सदस्याने सोडली संघाची साथ

**महाईन्यूज । दुबई**

**भारतीय संघाच्य सपोर्ट स्टाफमध्ये गेल्या काही महिन्यांत अनेक बदल झाले आहेत. गौतम गंभीरच्या ताफ्यातील सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोशेटने सहाय्यक प्रशिक्षकपद सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर क्षेत्ररक्षण टी दिलीप यांनी देखील भारतीय संघाची साथ सोडली. २ दिवसानंतर भारतीय संघ ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेत अफगाणिस्तानचा सामना करण्यासाठी मैदानात उतरणार आहे.**




पण ही मालिका सुरू होण्याआधीच भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. भारतीय संघाच्या फिजिओने राजीनामा दिला आहे.

क्रिकबझच्या वृत्तानुसार, भारतीय संघाचे फिजिओ कमलेश जैन यांनी बीसीसीआयकडे राजीनामा सोपवला आहे. पण बीसीसीआयने त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नाही. बीसीसीआयच्या सुत्राने दिलेल्या माहितीनुसार, कमलेश जैन हे सध्या नोटीस पिरियडवर आहेत. नोटीस पिरियडचा कालावधी ३ महिन्यांचा असणार आहे. मायदेशात अफगाणिस्तान आणि वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका झाल्यानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. हा दौरा भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. या दौऱ्यानंतर कमलेश जैन यांचा कार्यकाळ समाप्त होऊ शकतो.

भारताचा न्यूझीलंड दौरा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा दौरा असणार आहे. हा दौरा कमलेश जैन यांच्या कारकिर्दीतील शेवटचा दौरा असू शकतो. बीसीसीआयकडून त्यांना नोटीस पिरियड संपण्याआधी देखील रिलीव्ह केले जाऊ शकते. पण याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. कमलेश जैन भारतीय संघात येण्याआधी नितीन पटेल हे फिजिओच्या भूमिकेत होते. तसेच कमलेश जैन यांच्याकडे आयपीएल स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्स संघासोबत काम करण्याचा देखील अनुभव आहे.

दरम्यान, कमलेश जैन यांच्या राजीनाम्यामुळे भारतीय संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन फिजिओच्या नियुक्तीसाठी बीसीसीआयकडून लवकरच प्रक्रिया सुरू केली जाऊ शकते. मात्र, कमलेश जैन यांच्या जागी कोणाची नियुक्ती होणार, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

### नेमकं कारण काय?

कमलेश जैन यांनी अचानक राजीनामा का दिला? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. बीसीसीआयच्या एका सुत्राने क्रिकबझला दिलेल्या माहितीत सांगितले की, “ते गेल्या साडे चार वर्षांपासून भारतीय संघाचा भाग आहेत. त्यांना भारतीय संघासोबत काम करताना खूप मजा आली, पण भारतीय संघाच्या दौऱ्यांमुळे ते आपल्या कुटुंबाला पुरेसा वेळ देऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे.” गेल्या काही वर्षांत भारतीय संघ लागोपाठ मालिका खेळण्यात व्यस्त आहे. आता अफगाणिस्तान आणि वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका झाल्यानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर रवाना होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™


ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।

दि. 12 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# आदर्श शिक्षक पुरस्काराने ९ शिक्षकांचा सन्मान

## अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आणि लायन्स क्लब ऑफ इनोव्हेशन पारितोषिक वितरण सोहळा आयोजन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आणि लायन्स क्लब ऑफ इनोव्हेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्राधिकरण, निगडी येथे आदर्श शिक्षक पुरस्कार, विद्यार्थी गुणगौरव समारंभ आणि गौरी-गणपती सजावट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. भूषण ओझर्डे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.**



दीपप्रज्वलन आणि गणेशस्तोत्र पठणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्याध्यक्ष महेश बारसावडे यांनी प्रास्ताविकातून पिंपरी-चिंचवड शहरातील कार्याचा आढावा घेतला. प्रदेश सरचिटणीस दिलीप कुलकर्णी यांनी महासंघाच्या देशव्यापी कार्याची माहिती दिली, तर लायन्स क्लबचे सलीम शिकलगार यांनी त्यांच्या सामाजिक उपक्रमांचा परिचय करून दिला. या सोहळ्यात १० गरजू विद्यार्थ्यांना रोख शिष्यवृत्ती देण्यात आली, तसेच ७५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. मागील वर्षी आयोजित गौरी-गणपती सजावट स्पर्धेतील विजेत्या सुनिता डोईफोडे, सुषमा वैद्य आणि अनिता कुलकर्णी यांना अनुक्रमे पारितोषिके प्रदान करण्यात आली. या सोहळ्यात यंदा प्रथमच आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

पुरस्कारार्थींच्या वतीने मकरंद गुर्जर, नितीन साळी आणि स्नेहा पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात निखिल लातूरकर यांनी शिक्षकांनी समाजातील किमान दोन गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. प्रमुख वक्ते प्रा. भूषण ओझर्डे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करू देण्याचा सल्ला पालकांना दिला आणि प्रगत शेती तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर शहराध्यक्ष सचिन कुलकर्णी, ब्रह्मोद्योग प्रदेश उपाध्यक्ष राजन बुडुख, प्रमुख प्रवक्ते डॉ. संजय सुपेकर, लायन्स क्लब ऑफ इनोव्हेशनचे अध्यक्ष संदेश मुखेडकर, झोन चेअरमन प्रवीण शेलार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्विन गुडसूडकर यांनी केले, आभार सरचिटणीस आनंद देशमुख यांनी मानले, तर सुषमा वैद्य यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### आदर्श शिक्षक पुरस्कारार्थी

- सौ. वृंदाताई गोसावी
- श्री. मकरंद गुर्जर
- सौ. स्नेहा शेखर पाठक
- सौ. जान्हवी जोशी
- सौ. दिपाली पाटील
- श्री. जीवन देशमुख
- सौ. दर्शना पोलकम
- श्री. नितीन साळी
- सौ. स्नेहल कुलकर्णी

# पिंपरी-चिंचवडमध्ये गणेशोत्सवासाठी १११ गणेश मंडळांना परवाने

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने शहरातील गणेश मंडळांना परवाने देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयनिहाय आतापर्यंत एकूण १११ गणेश मंडळांना परवाने देण्यात आले आहेत. तसेच गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरात एकूण १०४ विसर्जन ठिकाणांची व्यवस्था करण्यात आली आहे.**



क्षेत्रीय कार्यालयनिहाय परवानगी देण्यात आलेल्या गणेश मंडळांची संख्या पुढीलप्रमाणे आहे – ब क्षेत्रीय कार्यालय २३, क क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय १६, इ क्षेत्रीय कार्यालय १५, फ क्षेत्रीय कार्यालय १७, ग क्षेत्रीय कार्यालय २०, ह क्षेत्रीय कार्यालय १५, ज क्षेत्रीय कार्यालय २ आणि ल क्षेत्रीय कार्यालय १, अशी एकूण १११ मंडळांना परवानगी देण्यात आली आहे.

गणेशमूर्ती विसर्जनासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अ क्षेत्रीय कार्यालय १०, ब १४, क १२, ड १२, इ १३, फ ११, ग ६, ह १२, ज ९ आणि ल ५ अशा एकूण १०४ विसर्जन ठिकाणांची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच गणेशमूर्तींचे विसर्जन सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने करता यावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या विसर्जन ठिकाणांचा वापर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



“गणेशोत्सव हा आपल्या शहरातील नागरिकांच्या श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. हा उत्सव आनंदमय, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांना परवाने देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, विसर्जनासाठीही मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करून महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे.”

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.



“गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांना परवाने देण्यासोबतच विसर्जनासाठी १०४ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सुरक्षित आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा.”

- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# व्यवस्थापनेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि विनियोग



**आजच्या अत्यंत वेगवान आणि जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) हा शब्द केवळ माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही; तर ती आधुनिक व्यवस्थापनशास्त्राची एक अपरिहार्य गरज बनली आहे. एकेकाळी केवळ कल्पनारंजनापुरते मर्यादित वाटणारे हे तंत्रज्ञान आता कॉर्पोरेट जगाच्या निर्णयप्रक्रियेच्या केंद्रस्थानी विराजमान झाले आहे. विशेषतः जनकात्मक कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (Generative AI) 'केवळ माहितीचे विश्लेषण करणारे तंत्रज्ञान' ते 'प्रत्यक्ष कामकाजात सहभागी होणारे तंत्रज्ञान' असा या तंत्रज्ञानाचा प्रवास सुरू झाला आहे.**

**जागतिक आकडेवारी आणि वास्तव**

जागतिक स्तरावरील नामांकित सल्लागार संस्थांच्या अलीकडील अभ्यासांवर नजर टाकल्यास व्यवस्थापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव किती वेगाने होत आहे, याची प्रचिती येते. मॅकिन्से (McKinsey) च्या सर्वेक्षणानुसार जगभरातील बहुसंख्य संस्था — सुमारे तीन-चतुर्थांशाहून अधिक — आपल्या किमान एका व्यावसायिक कार्यक्षेत्रात जनकात्मक कृत्रिम बुद्धिमत्तेचा नियमित वापर करू लागल्या आहेत, आणि हे प्रमाण गेल्या दोन-तीन वर्षांत लक्षणीयरीत्या वाढले आहे. मात्र त्याचबरोबर बहुसंख्य संस्थांना अद्याप त्यातून महसुलावर ठोस आणि मोजता येण्याजोगा परिणाम साधता आलेला नाही, असेही याच अभ्यासांत नमूद आहे. यावरून हे स्पष्ट होते की आता प्रश्न 'कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायची की नाही?' हा उरलेला नसून 'तिचा व्यवसायमूल्य निर्माण करण्यासाठी प्रभावी विनियोग कसा करायचा?' हा आहे.

डेलॉईट च्या अहवालानुसार, मोठ्या संख्येने संस्थांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे उत्पादकतेत आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ नोंदवली असून, अनेक संस्थांना अधिक अचूक व जलद धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत होत आहे. तरीही केवळ मोजक्याच कंपन्याच या तंत्रज्ञानाचा संपूर्ण उपक्रम-पातळीवर विस्तार करू शकल्या आहेत, हा विरोधाभासही अधोरेखित करण्याजोगा आहे. यावरून असे दिसते की कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार वेगाने होत असला, तरी तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परिपक्व व्यवस्थापकीय दृष्टिकोन आणि सक्षम पायाभूत सुविधा अत्यावश्यक आहेत.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा व्यवस्थापनाच्या विविध क्षेत्रांतील विनियोग**

वित्त व्यवस्थापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आर्थिक नोंदींचे स्वयंचलन, भविष्यातील महसूल व नफ्याचा अंदाज, पत-जोखीम मूल्यांकन आणि फसवणूक शोधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. ईवाय (EY) आणि केपीएमजी यांसारख्या संस्थांच्या निरीक्षणानुसार, लेखापरीक्षण व अनुपालन प्रक्रियेत या तंत्रज्ञानामुळे मानवी चुकांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे. त्यामुळे मुख्य वित्त अधिकाऱ्याची भूमिका केवळ अहवाल तयार करण्यापुरती न राहता माहितीआधारित धोरणात्मक निर्णयनिर्मितीकडे वळत आहे.

मनुष्यबळ व्यवस्थापनात भरती प्रक्रिया, बायोडेटा छाननी, कर्मचारी सहभाग विश्लेषण, कौशल्यविकास आणि कर्मचारी गळतीचा अंदाज यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता सर्वसामान्य बाब बनली आहे. डेलॉईटच्या अभ्यासानुसार, बहुसंख्य कंपन्यांमध्ये या तंत्रज्ञानामुळे कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरूपात व जबाबदाऱ्यांमध्ये लक्षणीय बदल घडत आहेत. मात्र भरतीसारख्या संवेदनशील प्रक्रियेत अल्गोरिदमिक पूर्वग्रह, गोपनीयता आणि मानवी विवेक यांचा विचार अपरिहार्य ठरतो.

विपणन व विक्री व्यवस्थापनात ग्राहक विभागणी, भावविश्लेषण, वैयक्तिकृत जाहिराती, शिफारस-प्रणाली आणि संवादसाहाय्यक (chatbots) यांमुळे प्रत्येक ग्राहकासाठी अधिक वैयक्तिक अनुभव निर्माण करता येतो. बाजारातील मागणीनुसार किमतींत बदल करणारी 'गतिशील किंमतरचना' आणि भविष्यवेधी विक्री-अंदाज यांमुळे कंपन्यांचा गुंतवणुकीवरील परतावा वेगाने वाढत आहे.

पुरवठा साखळी व लॉजिस्टिक्स व्यवस्थापनात मागणीचा अंदाज, साठा अनुकूलन, मार्ग अनुकूलन, गोदाम स्वयंचलन आणि पुरवठादार-जोखीम विश्लेषण यांमुळे खर्चात घट आणि सेवा-वितरण अधिक लवचिक बनले आहे. जागतिक महामारीनंतरच्या अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी अशा प्रणाली स्वीकारल्या आहेत.

उत्पादन व कार्यचालन व्यवस्थापनात पूर्वानुमानित देखभाल, संगणकीय दृष्टी (computer vision) आधारित गुणवत्ता तपासणी आणि उत्पादन नियोजन यांमुळे उत्पादकता वाढली आहे. यंत्रसामग्रीतील संभाव्य बिघाड आधीच ओळखता येत असल्याने उत्पादन खंडित होण्याचे प्रमाण घटले आहे.

भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेतही ही संधी मोठी आहे — नॅसकॉम च्या अभ्यासानुसार माहिती व कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात नजीकच्या काळात कोट्यवधी डॉलरची भर पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**आव्हाने आणि भविष्यातील वाटचाल**

इतके फायदे असूनही, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अंमलबजावणीत गंभीर आव्हाने आहेत. आयबीएम (IBM) च्या अभ्यासानुसार माहितीची अचूकता व पूर्वग्रह, स्वामित्व-माहितीची कमतरता आणि तज्ज्ञ मनुष्यबळाचा अभाव हे प्रमुख अडथळे ठरत आहेत. यासोबतच माहिती-गोपनीयता, वाढते सायबरहल्ले आणि रोजगारातील बदल यांसारख्या नैतिक प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष द्यावे लागेल. त्यामुळे 'जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता', योग्य प्रशासन-चौकट आणि मानवी विवेकाचा समावेश ही भविष्यातील व्यवस्थापनाची अनिवार्य तत्त्वे ठरणार आहेत.

**निष्कर्ष**

थोडक्यात, कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी व्यवस्थापकाला पर्याय ठरणारी शक्ती नसून, त्याच्या बुद्धिमत्तेला अधिक वेग, व्याप्ती आणि अचूकता देणारी सहकारी शक्ती आहे. जो व्यवस्थापक आणि जी संस्था हे तंत्रज्ञान केवळ खर्च-बचतीसाठी नव्हे, तर व्यवसायाच्या मूळ रचनेत खोलवर परिवर्तन घडवण्यासाठी वापरेल, तीच संस्था भविष्यातील जागतिक स्पर्धेत खऱ्या अर्थाने टिकून राहील. भविष्यातील व्यवस्थापकाला केवळ वित्त, मनुष्यबळ किंवा विपणनाचे ज्ञान पुरेसे ठरणार नाही; त्याला माहिती-साक्षरता, कृत्रिम-बुद्धिमत्ता-साक्षरता, चिकित्सक विचारशक्ती आणि नैतिक निर्णयक्षमता यांची सांगड घालावी लागेल. व्यावसायिक नेते, उद्योगपती, प्राध्यापक आणि विशेषतः विद्यार्थिवर्गाने या झपाट्याने होणाऱ्या बदलांना सामोरे जाण्यासाठी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे, हीच काळाची सर्वात मोठी आणि अटळ गरज आहे.



**डॉ. अमोल माने**
**सहयोगी प्राध्यापक आणि अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा**
**माईर्स एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी, पुणे**

# ‘आत्महत्येविषयीची कथा बदलूया - संवादाची सुरुवात करूया’

## जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त लायन्स इंटरनॅशनल, डिस्ट्रिक्ट ३२३४ डी२ यांच्या वतीने ‘आत्महत्येविषयीची कथा बदलूया – संवादाची सुरुवात करूया’ या विषयावर महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड विद्यापीठ, मावळ, पुणे येथे करण्यात आले.**




या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक लायन्स क्लब ऑफ पुणे इनोव्हेशन असून क्लबचे अध्यक्ष लायन संदेश मुखेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये लायन्स क्लब ऑफ पूना निगडी, लायन्स क्लब ऑफ पुणे भोसरी आणि लायन्स क्लब ऑफ पुणे देहूरोड यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास डॉ. संतोष सोनवणे, कुलगुरू, पिंपरी चिंचवड विद्यापीठ तसेच एमजेएफ लायन सलीम शिकलगार, विभागीय अध्यक्ष, विभाग ३ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी एमजेएफ लायन रश्मी नायर, जिल्हा अध्यक्ष – मानसिक आरोग्य व कल्याण तसेच प्रा. रुचू कुथियाला, अधिष्ठाता व विभागप्रमुख, विज्ञान शाखा, पिंपरी चिंचवड विद्यापीठ यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमास लायन्स क्लब ऑफ पुणे इनोव्हेशनचे अध्यक्ष लायन संदेश मुखेडकर, सचिव लिओ लायन अश्विन गुडसुरकर, खजिनदार प्रदीप रॉय,लायन संदीप मोरे,लिओ अध्यक्ष भूषण तरकसे, लिओ अभिषेक आडे व लिओ लिऑन कुटिन्हो उपस्थित होते.

तसेच लायन्स क्लब ऑफ पूना निगडीच्या अध्यक्ष लायन शिल्पी कुमार व लिओ अथर्व, लायन्स क्लब ऑफ पुणे भोसरीचे अध्यक्ष लायन अतुल बोरुळे व लायन शैलजा सांगळे , तसेच लायन्स क्लब ऑफ पुणे देहूरोडचे सचिव लायन व्यंकटथलापती यांचीही उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सन्निध्या मिसाळ मॅडम आणि रुची चंदन मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेणे तसेच कार्यक्रमाच्या सुरळीत आयोजनासाठी त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

कार्यक्रमातील प्रमुख मार्गदर्शक डॉ. संतोष चव्हाण, मानसोपचार तज्ज्ञ, ज्युपिटर हॉस्पिटल आणि डॉ. सौरभ चव्हाण, प्राध्यापक, मानसशास्त्रज्ञ व संस्थापक – हीलिंग हार्ट्स कौन्सेलिंग सर्व्हिसेस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्य, तणाव, नैराश्य, भावनिक अडचणी आणि आत्महत्येच्या विचारांवर मात करण्यासाठी संवाद साधण्याचे तसेच योग्य वेळी मदत घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

कार्यक्रमादरम्यान एमजेएफ लायन सलीम शिकलगार यांनी विद्यार्थ्यांना लायन्स इंटरनॅशनलच्या कार्याची व सेवाभावी उपक्रमांची माहिती दिली. समाजसेवेच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना मदत करण्याबरोबरच देशाच्या आणि समाजाच्या प्रगतीत प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच विद्यार्थ्यांनी लिओ क्लबमध्ये सहभागी होऊन सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत तज्ज्ञांशी मनमोकळा संवाद साधला आणि विविध प्रश्न विचारले. ‘आत्महत्या हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही; जीवन अमूल्य आहे’ हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांनी ‘आत्महत्येला नकार, जीवनाला होकार’ हा सकारात्मक संदेश स्वीकारत जीवनाला प्राधान्य देण्याचा संकल्प केला.

लायन्स क्लब ऑफ पुणे इनोव्हेशन यांच्या नेतृत्वाखाली आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारा, संवादाला प्रोत्साहन देणारा आणि आशा, आधार व जीवनमूल्यांचा सकारात्मक संदेश देणारा ठरला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी लायन्स क्लब ऑफ पुणे इनोव्हेशनचे अध्यक्ष लायन संदेश मुखेडकर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे, मार्गदर्शकांचे, शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाने दिलेल्या सहकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे विशेष आभार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व लायन्स व लिओ सदस्यांचेही त्यांनी आभार मानले.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशीच्या विद्यार्थिनीचे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशीच्या इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी राजसी पाठक हिने जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत काता प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत तसेच कुमिते प्रकारात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी तळवडे हॉल, चिखली येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

राजसीने ७ वर्षे वयोगटातील मुलींच्या २० किलो वजनगटात उत्कृष्ट कामगिरी केली.तिच्या खेळातील जिद्द, आत्मविश्वास, चपळता आणि कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.




लहान वयात मिळवलेले हे यश तिच्या मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे द्योतक आहे.राजस्वीच्या या यशामागे तिच्या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन मोलाचे ठरले. तिच्या शानदार कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व क्रीडा विभागाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. राजसीची ही कामगिरी शाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.

राजसीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य, शिक्षकवृंद, कर्मचारीवर्ग व पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.